शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.१८/२०२५

डॉ.अंकुश गौतम थाटे
रा.श्रीकृष्ण प्राईड-क,फ्लॅट नं.१८ ,
पंढरपूर रोड,मिरज ग्रामीण पोलीस स्टेनशच्या
समोर, मिरज,जि.सांगली ४१६४१० } तक्रार अर्जदार

**विरूध्द्**

१. यशवंत शिक्षण संस्था, सांगली,
देशभक्त आर पी पाटील कुपवाड ता. मिरज,
जि.सांगली ४१६४३६
२. लोकनेते प्रा.शदर पाटील महाविद्यालय, मिरज
शासकीय दुध डेअरीजवळ, मिरज, जि.सांगली } वि.प.

यशवंत शिक्षण संस्था, सांगली यांचे लोकनेते प्रा.शरद पाटील महाविद्यालय, मिरज जि.सांगली यांचेकडील सहाय्यक प्राध्यापक डॉ.अंकुश गौतम थाटे यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२५/०७/२०२५ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी दि.१६/०७/२०१२ रोजी सदर महाविद्यालयात रसायनशास्त्र या विषयाचा पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापक म्हणून सेवेत रूजू झालो. सदर नेमणूक ही हंगामी स्वरूपाची होती. विद्यापीठ निवड समितीमार्फत दि.०१/०६/२०१३ रोजी माझी नियुक्ती झाली असून त्या दिनांकापासून मी पुढे नियमित सेवेत आहे. मात्र दि.१६/०७/२०१२ ते दि.३१/०५/२०१३ या कालावधीत मी पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम केलेले आहे, तरी मला संस्थेने नाममात्र तोकडी रक्कम अदा केली आहे. विद्यापीठाने मला पूर्णवेळ शिक्षक म्हणून मान्यता दिली आहे. याशिवाय मे २०१३ या महिन्याचे वेतन मला अजिबात अदा केलेले नाही. मेजर टर्म काम केले असल्याने मला सुटटीतील पगार देय आहे. वारंवार मागणी करूनही महाविद्यालय व्यवस्थापनाने मला ते वेतन अदा केलेले नाही. त्यामुळे दि.१६/०७/२०१२ ते दि.३१/०५/२०१३ या कालावधीतील अदा न केलेले थकीत वेतन अदा करण्याबाबत संबधित महाविद्यालयास आदेश व्हावेत ही विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

महाविद्यालयाने दि.१८/०८/२०२५ रोजीच्या पत्राने तक्रारदार यांनी अर्जात त्यांना दि.१६/०७/२०१२ ते दि.३१/०५/२०१३ कालावधीतील शासन नियमानुसार वेतन मिळाले नसलेबाबत

तक्रार केली होती. महाविद्यालयाने सदर कालावधीतील वेतन अदा केले असून डॉ.अंकुश थाटे यांनी तक्रार मागे घेतली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदारांनी दिनांक १८/०८/२०२५ रोजीचे पत्र या समितीला पाठवून दरम्यानच्या काळात संस्थेने शासन नियमानुसार दिनांक १६/०७/२०१२ ते दिनांक ३१/०५/२०१३ या कालावधीतील देय वेतन संस्थेने दिनांक १६/०८/२०२५ रोजी त्यांच्या खात्यावर जमा केले असल्याने ते तक्रार मागे घेत असल्याचे नमूद करुन तक्रार अर्ज रद्द करावा अशी विनंती केलेली आहे. त्याच सोबत महाविद्यालयाने दिनांक १८/०८/२०२५ रोजी तक्रारदाराची तक्रार, तक्रारदारांनी नमूद केलेल्या कारणास्तव रद्द समजण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. दोन्ही पत्रे या कार्यालयास दिनांक २०.०८.२०२५ व दिनांक २८/०८/२०२५ अनुक्रमे पोहोच झालेली आहेत.

सबब, तक्रारदाराची तक्रार त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्यामुळे आणि त्यांनी ती बिनशर्त मागे घेतल्यामुळे खारिज करावी लागेल असे या समितीचे मत आहे. सबब, सदरची तक्रार खारिज करण्यात येत आहे.

**आदेश**

सदरची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविणेत यावे.

**दिनांक :** 26 SEP 2025

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)